# महाराष्ट्र कौन्सिल ऑफ होमिओपॅथी,

२३५ पेनिनसुला हाऊस, ३ रा मजला, डॉ. दादाभाई नौरोजी रोड,
फोर्ट, मुंबई ४००००१
फोन नं. २२७०४४००, २२७०३०८६ फॅक्स (०२२) २२७०३०८६
E-mail : mail@mchmumbai.org Website - www.mchmumbai.org


## जाहिर सूचना

महाराष्ट्र होमिओपॅथी परिषदेच्या पंचवार्षिक निवडणूका २०१५-२०२० करिता नोंदणीकृत वैद्यकीय व्यावसायिक मतदार संघाकरिता प्राथमिक यादी तयार करण्याकरिता परिषदेने दि.१४ जानेवारी २०१५ रोजी राज्यातील विविध वर्तमानपत्रे व परिषदेचे संकेतस्थळ यावरुन जाहिर सूचना दिली होती. या निवडणूकांकरिता दि. १ जुलै २०१५ पर्यंत अद्ययावत केलेली प्राथमिक यादी परिषदेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. या यादीचे अवलोकन करुन व्यावसायिकांनी यादीत आपले नाव असल्याची खात्री करुन घ्यावी. या यादीवर काही आक्षेप किंवा हरकती असल्यास त्या लिखित स्वरुपात प्रबंधक तथा निर्वाचन अधिकारी, महाराष्ट्र होमिओपॅथिक परिषद, मुंबई यांचेकडे दि. ३० जुलै २०१५ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत दाखल कराव्यात. तसेच ज्या वैद्यकीय व्यावसायिकांच्या नोंदणी नुतनीकरणाची मुदत उलटून गेली आहे किंवा ज्यांच्या नुतनीकरणाची मुदत दि. ६ ऑक्टोबर २०१५ पर्यंत संपत आहे, अशा सर्व नोंदणीकृत व्यावसायिकांनी फॉर्म "जे" सह आपले मूळ नोंदणीपत्र व त्या त्या प्रकरणी परिषदेने निर्धारित केलेले शुल्क यासह नुतनीकरण अर्ज दाखल करुन नुतनीकरण करुन घ्यावे. निवडणूकीकरिता प्रसिध्द केलेल्या प्राथमिक यादीवर दि. ३० जुलै २०१५ नंतर प्राप्त होणाऱ्या हरकती व आक्षेप यावर विचार केला जाणार नाही.

(दि. स्ना. कुमार)
निर्वाचन अधिकारी व प्रबंधक
महाराष्ट्र कौन्सिल ऑफ होमिओपॅथी, मुंबई १

ठिकाण - मुंबई
दि.- २ जुलै २०१५